अर्णबला कारागृह अधीक्षकांनीच कोठडीत मोबाईल पुरवला

▌निलंबित पोलीस अनंत भेरे, सचिन वाडे यांचा बॉम्बगोळा
▌आम्हाला बळीचा बकरा बनवले... ए. टी. पाटलांवरच कारवाई करा!

अलिबाग, दि. १२ (प्रतिनिधी) - न्यायालयीन कोठडीत असताना अर्णब गोस्वामीला जिल्हा कारागृह अधीक्षक ए. टी. पाटील यांनीच मोबाईल पुरवल्याच्या आरोपाचा जबरदस्त बॉम्बगोळा निलंबित पोलीस अनंत भेरे आणि सचिन वाडे यांनी आज फोडला. आमच्यावर निलंबनाची कारवाई करून पाटील यांनी आम्हाला बळीचा बकरा बनवला आहे. त्यांच्यावरच कठोर कारवाई व्हायला हवी, अशी मागणी या दोन्ही निलंबित पोलिसांनी केली. त्यामुळे अलिबाग कारागृहाचा कारभारच संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

बिसलेरी, बिछाना आणि ओडोमासही पुरवले

अनंत भेरे आणि सचिन वाडे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधून आरोपाचा ॲटम बॉम्बच फोडला. अर्णबला मोबाईल आम्ही नव्हे तर जिल्हा कारागृह अधीक्षक ए. टी. पाटील यांनीच पुरवला. हे योग्य नाही, असे आम्ही सांगत होतो, परंतु तुम्ही तुमचे काम करा. तुरुंग अधीक्षक तुम्ही आहात की मी, अशी दमबाजीही केली. इतकेच नव्हे तर अर्णबला बिसलेरीचे पाणी, बिछाना आणि ओडोमासही ए. टी पाटील यांनीच पुरवले. कारागृह अधीक्षकांवरच कारवाई करा, अशी मागणीच त्यांनी केली.

प्रख्यात वास्तुविशारद अन्वय नाईक यांच्या आत्महत्या प्रकरणातील आरोपी रिपब्लिक टीव्हीचा अर्णब गोस्वामी, स्काय मीडिया कंपनीचा फिरोज शेख आणि स्मार्ट वर्क्स कंपनीचा नितेश सारडा यांना रायगड पोलिसांनी अटक केली. या तिघांनाही न्यायदंडाधिकाऱ्यांनी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावली. अर्णबसह दोघांनाही अलिबाग नगर परिषद मराठी शाळा नं. १ मध्ये कैद्यांसाठी तयार करण्यात आलेल्या कोविड सेंटरमध्ये ठेवण्यात आले. तत्पूर्वी त्यांच्याकडील मोबाईल काढून घेण्यात आले होते.

शुक्रवारी ६ नोव्हेंबर रोजी अर्णबला मोबाईलवर सर्फिंग करताना आणि सोशल मीडियावर पोस्ट करताना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक जमाल शेख यांनी रंगेहाथ पकडले. त्यामुळे प्रचंड खळबळ उडाली. अर्णबला मोबाईल दिला कोणी? याची चर्चा आणि चौकशीही सुरू झाली. त्यानंतर कोविड सेंटर जेलचे सुभेदार अनंत भेरे आणि जेल पोलीस सचिन वाडे या दोघांवरही निलंबनाची कारवाई करण्यात येऊन अर्णबची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली होती.

घोडबंदर सर्व्हिस रोडच्या मार्गातील वनविभागाचा 'स्पीड ब्रेकर' दूर

खासदार राजन विचारे यांच्या प्रयत्नांना यश

ठाणे, दि. १२ (प्रतिनिधी) – घोडबंदर मार्गावरील वाहतूककोंडी फोडण्याच्या सर्व्हिस रोडवरील मार्गावर चार ठिकाणी वनविभागाने लावलेला स्पीड ब्रेकर अखेर हटणार आहे. खासदार राजन विचारे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे संजय गांधी उद्यानाच्या हद्दीतून जाणाऱ्या या मार्गाला परवानगी देण्याची तयारी वनविभागाने दर्शवली आहे. लवकरच ही जमीन महापालिकेला हस्तांतरित करण्यात येणार असल्याने गेल्या २० वर्षांपासून रखडलेला सर्व्हिस रोड अखेर मार्गी लागणार आहे.

ठाणे महानगरपालिकेने पूर्वद्रुती महामार्गाच्या शेजारी सर्व्हिस रोड मार्ग बांधले. मात्र तीन हात नाक्यापासून ते गायमुखपर्यंत असलेल्या सर्व्हिस रोडमधील चार ठिकाणी वनविभागाची जागा आहे. ही जागा हस्तांतरित न झाल्याने आणि परवानगी न मिळाल्याने ही कामे अनेक वर्षांपासून रखडलेली होती. हा अडथळा दूर करण्यासाठी खासदार राजन विचारे यांनी मंत्रालयात मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशीषकुमार सिंग यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य वनसंरक्षक आणि महापालिका आयुक्त यांच्यासोबत बैठक घेतली होती. त्या अनुषंगाने खासदार राजन विचारे यांनी बुधवारी सायंकाळी प्रत्यक्ष स्पॉटवर पाहणी केली. यावेळी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे परिक्षेत्र वनाधिकारी राजेंद्र पवार यांनी लवकरच महापालिकेला काम सुरू करण्यास आम्ही परवानगी देऊ असे आश्वासन दिले. यावेळी नगरसेवक नरेश मणेरा, ठाण्याचे वाहतूक शाखेचे उपायुक्त बाळासाहेब पाटील, ठाणे महानगरपालिकेचे मुख्य अभियंता रवींद्र खडताळे, शहर विकास विभागाचे रामदास शिंदे आदी उपस्थित होते.

▌तीन वर्षांत ५०० अपघात

गेल्या तीन वर्षांत या मार्गावर ५०० हून अधिक अपघात झाले असून १५० अपघाती मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळेच या जागा अधिग्रहित करून सर्व्हिस रोड पूर्ण करणे अत्यंत आवश्यक बनले होते, असे खासदार राजन विचारे यांनी सांगितले.

▌रखडलेला मार्ग

पातलीपाडा तबेला – ६८ मीटर, डोंगरीपाडा –७२ मीटर, कॉसमॉस (डी मार्ट)– ३४ मीटर, गायमुख–२८८ मीटर.

ठाण्यातील प्रभाग समित्यांवर महिलाराज

सहा प्रभाग शिवसेनेकडे

ठाणे, दि. १२ (प्रतिनिधी) – ठाणे पालिकेच्या स्थायी समिती सभापती आणि परिवहन समितीच्या सभापतीपदी शिवसेनेचे शिलेदार बिनविरोध निवडून आले असतानाच नऊपैकी सहा प्रभाग समित्यांवरही शिवसेनेचा भगवा फडकला आहे. दोन प्रभाग समित्या राष्ट्रवादीकडे तर भाजपला दे धक्का देत एका प्रभाग समितीवर काँग्रेसने वर्णी लावली आहे. विशेष म्हणजे नऊपैकी आठ प्रभाग समित्यांच्या सभापतीपदी महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रभाग समित्यांवर महिलाराज आले आहे.

प्रभाग समितीनिहाय सभापती

वागळे–एकता भोईर (शिवसेना), वर्तकनगर–राधिका फाटक (शिवसेना), लोकमान्यनगर–सावरकरनगर–आशा डोंगरे (शिवसेना), नौपाडा–कोपरी–नम्रता फाटक (शिवसेना), माजिवाडा–मानपाडा– भूषण भोईर (शिवसेना), दिवा–सुनीता मुंडे (शिवसेना), कळवा–वर्षा मोरे (राष्ट्रवादी), उथळसर–वहिदा खान, मुंब्रा–दीपाली भगत (काँग्रेस).

शहापूरच्या खरेदी-विक्री संघावर भगवा

सभापतीपदी शिवसेनेचे शेखर अधिकारी

खर्डी, दि. १२ (सा.वा.) – शहापूर तालुका खरेदी–विक्री संघावर भगवा फडकला आहे. शिवसेनेचे शेखर अधिकारी यांची सभापतीपदी वर्णी लागली आहे. विशेष म्हणजे या संघात शिवसेनेचे फक्त चारच सदस्य असतानाही सभापतीपद शिवसेनेने खेचून आणल्यामुळे तालुक्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून भाजपला जोरदार धक्का बसला आहे.

शहापूर खरेदी–विक्री संघात १७ सदस्य आहेत. त्यामध्ये शिवसेनेचे फक्त चारच सदस्य आहेत. सभापती पदाच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेच्या वतीने शेखर अधिकारी यांना उतरविण्यात आले होते, तर त्यांच्या विरोधात भाजपने प्रमोद बसवंत यांना उमेदवारी दिली होती. राष्ट्रवादीचाही बसवंत यांनाच पाठिंबा होता. मात्र या अटीतटीच्या लढतीमध्ये अधिकारी यांना एकूण नऊ मते पडली, तर बसवंत यांच्या खात्यात फक्त आठ मते जमा झाली आणि त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. खरेदी–विक्री संघाच्या सभापती शिवसेनेने पहिल्यांदा भगवा फडकविल्याने तालुक्यात ठिकठिकाणी फटाके फोडून दिवाळी साजरी केली. शेखर अधिकारी यांचे माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी स्वागत केले आहे. याप्रसंगी तालुकाप्रमुख मारुती धिर्डे, खरेदी–विक्री संघाच्या उपसभापती उषाताई करण, पुंडलिक शिर्के, शामबाबा परदेशी, लक्ष्मण विशे, पद्माकर वेखंडे, विनायक सापळे, बाळा धानके आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेकरिता करारावर सागर मित्र नियुक्तीसाठी जाहिरात

(जिल्हा : मुंबई उपनगर)

सागरी जलक्षेत्राचा पुरेपूर वापर करून मस्त्योत्पादनात वाढ करणे, मूल्यवर्धन व निर्यात मूल्यात वाढ करणे, जलक्षेत्राची सरासरी उत्पादकता वाढविणे आणि काढणीपश्चात नुकसान कमी करणे याद्वारे एकूणच राष्ट्रीय दरडोई उत्पादनात वाढ करणे. याकरिता केंद्र शासनाने महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना मंजूर केली आहे. सदर योजनेच्या सुसूत्रीकरण व समन्वयनाकरिता मुंबई उपनगर या सागरी जिल्ह्यांमध्ये 'सागर मित्र' या अभिनामाची १३ पदे ११ महिने या कालावधीकरिता (परत मुदतवाढीच्या तरतुदीसह) निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची असून त्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवाराची पात्रता, अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

- **अनिवार्य शैक्षणिक अर्हता**
  * Bachelor's degree in Fisheries Science/ Marine Biology/ Zoology,
  * **माहिती तंत्रज्ञान व संगणक प्रणालीबाबतचे अद्ययावत ज्ञान आवश्यक,** (MS-CIT/PG Diploma in IT)
- **प्राधान्य :-**
  * **पदव्युत्तर पदवीधारक जसे** M.F.Sc.
  * **स्थानिक भाषांचे (उदा. कोकणी/ मालवणी/ कोळी) ज्ञान.**
  * **स्थानिक ठिकाणी वास्तव्यास असणारे उमेदवारांस सर्वोच्च प्राधान्य.**
- **वय : -** अर्जदाराचे वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- **कामाचे स्वरूप :**
  १. मत्स्य व्यवसाय विभाग व मच्छीमार यामधील समन्वयक बनणे.
  २. स्थानिक लोकांमध्ये मत्स्य व्यवसाय विषयक जागरूकता निर्माण करणे.
  ३. काढणीपश्चात व्यवस्थापन, मासळी विक्री उपक्रम तसेच पर्यायी उपजीविकेच्या साधनाच्या आधारे महिला सबलीकरण करणे.
  ४. मच्छीमारांना तांत्रिक प्रशिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहित करणे. योजनेंतर्गत लाभार्थ्यांना तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) बनविण्यास मदत करणे.
  ५. मत्स्य व्यवसाय संसाधनाच्या व्यवस्थापनाबाबत सहभागात्मक उपक्रमांना प्रोत्साहन देणे.
- **दरमहा एकत्रित मानधन :** - रु. १०,०००/- (उल्लेखनीय / उत्कृष्ट कामांस अतिरिक्त मानधन रु. ५०००/- अनुज्ञेय राहील)
- **कामाचे ठिकाण:-** मुंबई उपनगर जिल्ह्यातील सागर मित्र नेमणुकीसाठी गावांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.
  १) गोराई २) मनोरी ३) मार्वे-मालवणी ४) येरंगळ - भाटी ५) मढ ६) पातवाडी ७) जुहू-तारा ८) जुहू - मोरागाव ९) खारदांडा १०) चिंबई ११) वेसावे १२) माहुल १३) ट्रॉम्बे

याबाबतची अधिक माहिती **http://nfdb.gov.in/>>http://nfdb.gov.in/guideline** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

इच्छुक अर्जदारांनी अनिवार्य शैक्षणिक पात्रता, वय (जन्मतारीख), रहिवास व अनुभवाचा पुरावा तसेच संपर्क ई–मेल व दूरध्वनी क्रमांकासह आपला अर्ज दिनांक २६/११/२०२० वा तत्पूर्वी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय कार्यालयाच्या पत्त्यावर न पाठविता फक्त खाली दिलेल्या ई–मेलवर सादर करावा. सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय कार्यालयांचा ई–मेल ॲड्रेस पुढीलप्रमाणे आहे.

मुंबई उपनगर – **sagarmitra.mumsub@gmail.com**

कार्यालयाचा पत्ता : सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय (तां), मुंबई उपनगर यांचे कार्यालय, सातवा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, चेतना कॉलेजसमोर, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१

प्राप्त अर्जाची छाननी करून, पात्र उमेदवारांना त्यांनी दिलेल्या ई–मेलवर मुलाखतीची तारीख, स्थळ व वेळ याबाबत कळविण्यात येईल. मुलाखतीसाठी येताना सोबत शैक्षणिक अर्हता, अनुभवाचा दाखला, रहिवासी पुरावा तसेच इतर तांत्रिक स्वरूपाचे प्रशिक्षण घेतले असल्यास त्याबाबतची सर्व मूळ प्रमाणपत्र सोबत आणावीत.

विशेष नोंद : १) सागर मित्र नियुक्ती ही योजना कालावधीसाठी निव्वळ तात्पुरती नियुक्ती असून योजना संपल्यावर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच या आधारे अर्जदारास भविष्यात शासकीय नोकरीचा कोणताही दावा करता येणार नाही.
२) मुलाखतीसाठी येण्या–जाण्याचा वा तत्सम कोणताही भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

डीजीआयपीआर/२०२०–२१/१२०२

इन्ट्रासॉफ्ट टेक्नॉलॉजीस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ५०२ ए, प्रथमेश, रघुवंशी मॉल कम्पाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३.
दू. : ९१-२२-४००४-०००८. फॅक्स : ९१-२२-२४९०-३१२३, ई-मेल : intrasoft@itlindia.com,
संकेतस्थळ : www.itlindia.com **CIN : L24133MH1996PLC197857**

३० सप्टेंबर,२०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्षाकरिता एकत्रीकृत अ-लेखापरीक्षित वित्तीय निष्कषांचा अहवाल

रू. लाखात

तपशील	तिमाही समाप्ती			अर्ध वर्ष अखेर		वर्ष अखेर
	३०.०९.२०२० (अलेखापरीक्षित)	३१.०६.२०२० (अलेखापरीक्षित)	३०.०९.२०१९ (अलेखापरीक्षित)	३०.०९.२०२० (अलेखापरीक्षित)	३०.०९.२०१९ (अलेखापरीक्षित)	३१.०३.२०२० (लेखापरीक्षित)
उत्पन्न						
१ प्रचलनामधून महसूल	१६७४३.१३	२१६९४.८६	१५७१३.७१	३८४३७.९९	३२८००.०७	५९०६७.५४
२ अन्य उत्पन्न	१२५.८१	१९७.१२	१५७.७९	३२२.९३	२२६.३४	४८५.४२
३ **एकूण उत्पन्न (१ + २)**	**१६८६८.९४**	**२१८९१.९८**	**१५८७१.५०**	**३८७६०.९२**	**३३०२६.४१**	**५९५५२.९६**
४ **खर्च**						
(ए) विक्री झालेल्या मालाचे मूल्य	११८३३.१९	१५८४०.३७	११६०५.२२	२७६७३.५६	२४०९४.५०	४३६४३.३७
(बी) शिपिंग आणि हॅण्डलिंग खर्च	१९२५.३२	२३३५.०८	१४६१.८६	४२६०.४०	३३१८.१७	५२५५.९२
(सी) विक्री आणि विपण खर्च	२१२३.५९	२६८७.१६	१७७३.२७	४८१०.७५	३६४७.१७	६६३७.९८
(डी) कर्मचारी लाभ खर्च	४३६.०६	३६८.४२	३९८.८६	८०४.४८	७३७.५९	१५६६.९२
(ई) वित्तव्यवस्था खर्च	८१.७२	९७.३२	१३०.८७	१७९.०४	२६५.५५	५५३.८७
(एफ) घसारा आणि कर्जफेड तरतूद खर्च	१०३.३४	१०५.९८	९९,५५	२०९.३२	१९९.८०	४०९.४३
(जी) इतर खर्च	३०२.३५	२५९.९५	३४१.९५	५६२.३०	६६५.२७	१२७२.२४
एकूण खर्च	**१६८०५.५७**	**२१६९४.२८**	**१५८११.५८**	**३८४९९.८५**	**३२९२८.०५**	**५९३३९.७३**
५ **करपूर्व नफा (३-४)**	**६३.३७**	**१९७.७०**	**५९.९२**	**२६१.०७**	**९८.३६**	**२१३.२३**
६ **कर खर्च**						
(ए) चालू कर	१७.१४	३४.८८	९.६७	५२.०२	१२.५३	३९.२८
(बी) स्थगित कर	-१५.९८	-५३.०३	- ४.५९	- ६९.०१	- ७.९९	- ३६.७४
(सी) प्राप्ती कर (अगोदरच्या वर्षाचा)	०.००	०.२९	- ०.०९	०.२९	- ०.१८	- ०.१८
७ **कालावधीसाठी निव्वळ नफा (५-६)**	**६२.२१**	**२१५.५६**	**५४.९३**	**२७७.७७**	**९४.००**	**२१०.८७**
८ इतर समावेशक उत्पन्न						
(१) नफा आणि तोट्याला नंतर पुनर्वर्गीकृत केले जाणार नाही त्या बाबी सेवायोजन उत्तर परिभाषित लाभ बंधनाचे पुनर्मापित लाभ	- ५.५०	- ५.५०	- २.७०	- ११.००	- ५.४०	- १०.७३
उपरोक्तवरील प्राप्तीकर प्रभाव	१.४७	१.४८	०.७३	२.९५	१.४६	२.९७
(२) नफा किंवा तोट्याला नंतर वर्गीकृत केले जाईल त्याबाबी ओसीआयद्वारे कर्जरोख्यामध्ये गुंतवणुकीच्या उचित मूल्यावरील लाभ	८.०१	१६.१६	४.६९	२४.१७	१४.६८	३.९७
विदेशी प्रचलनाच्या वित्तीय अहवालाच्या अनुवादावरील विनिमय फरक	- १०२.९३	- २.४२	१०१.१९	- १०५.३५	८७.०८	३६७.६९
उपरोक्तवरील प्राप्तीकर प्रभाव	- २.२२	- ४.५०	- १.३०	- ६.७२	- ४.०८	- १.०९
९ **सदर कालावधीसाठी एकूण समावेशक उत्पन्न (७ + ८)**	**- ३८.९६**	**२२०.७८**	**१५७.५४**	**१८१.८२**	**१८७.७४**	**५७३.६२**
१० **भरणा केलेले भाग भांडवल (प्रत्येक रु.१०चे दर्शनी मूल्य, संपूर्ण भरणा केलेले)**	**१४७३.१७**	**१४७३.१७**	**१४७३.१७**	**१४७३.१७**	**१४७३.१७**	**१४७३.१७**
११ **पुनर्मूल्यांकित राखीव वगळून राखीव/ अन्य समन्याय प्रती भाग मिळकत**						**१३३१६.१८**
१२ **प्रती भाग मिळकत (ईपीएस) (रु.) मुलभूत आणि सौम्यीकृत**	०.४२	१.४६	०.३७	१.८९	०.६४	१.४३
१३ **अतिरिक्त माहिती खालीलप्रमाणे आहे.**						
प्रचलनामधून महसूल	२०४.८०	२०८.१९	१३९.१७	४१२.९९	२८५.७२	६९०.०६
करपूर्व नफा (तोटा)	८७.७४	१८०.९०	४१.२५	२६८.६४	२४.०६	१३८.३८
कर पश्चात नफा / (तोटा)	८०.७८	१९७.७९	३४.८२	२७८.५३	१५.३९	११८.८८

मत्ता आणि दायित्वाचा एकत्रिकृत अहवाल

रु. लाखात

तपशील	सदर तारखेनुसार ३०-०९-२०२० (अलेखापरीक्षित)	सदर तारखेनुसार ३१-०३-२०२० (अलेखापरीक्षित)
मत्ता		
बिगर - प्रचलित मत्ता		
संपदा, प्लान्ट आणि इक्युपमेंट	१५८८.४७	१६४६.४२
अन्य अमूर्त मत्ता	३४५१.५९	२१२९.६८
मत्ता वापराचे अधिकार	१०२४.२२	११८०.३२
वित्तीय मत्ता		
(१) गुंतवणूक	६८२.०१	६७३.३७
(२) कर्ज	५.४०	५.२५
स्थगित कर मत्ता (निव्वळ)	२०५८.३८	२०१२.१९
प्राप्तीकर मत्ता (निव्वळ)	५१.३४	५२.११
अन्य बिगर - प्रचलित मत्ता	२४१.०५	२३०.२३
	९१०२.४६	**७९३०.३७**
प्रचलित मत्ता		
वस्तू सूची	१२००७.१६	१२२७८.४९
वित्तीय मत्ता		
(१) गुंतवणूक	५७३६.९१	६३८४.६७
(२) व्यापार प्राप्ती	३२७.१२	२६७.५१
(३) रोख आणि रोख समान	१९४३.२९	१७६९.१५
(४) इतर बँक शिल्लक	३३८.२१	११६.१५
(५) कर्ज	०.००	२.५७
(६) अन्य वित्तीय मत्ता	०.००	०.००
प्राप्तीकर मत्ता (निव्वळ)	०.००	१३.५८
अन्य प्रचलित मालमत्ता	२२३.७३	३५२.८२
	२०५७६.४२	**२११८४.९४**
एकूण मालमत्ता	**२९६७८.८८**	**२९११५.३१**
समन्याय आणि दायित्व		
समन्याय		
समभाग भांडवल	१४७३.१७	१४७३.१७
अन्य समन्याय	१३४९८.०१	१३३१६.१८
	१४९७१.१८	**१४७८९.३५**
दायित्व		
बिगर-प्रचलित दायित्व		
वित्तीय दायित्व		
(१) कर्ज	१०३००.६९	९७११.६९
(२) भाडेपट्टा दायित्व	८६९.६२	१००२.३६
(३) अन्य वित्तीय दायित्व	२.०१	२.०१
तरतूद	१५१.७२	१३०.९७
स्थगित कर्ज दायित्व (निव्वळ)	१०१.८३	११६.०४
अन्य बिगर - प्रचलित दायित्व	१००.४९	१०१.४८
	११५२६.२६	**११०६४.५५**
प्रचलित दायित्व		
वित्तीय दायित्व		
(१) व्यवसायीक देणे	२०२७.३९	१८५०.१३
(२) भाडेपट्टा दायित्व	२२६.७५	२३२.१६
(३) अन्य वित्तीय दायित्व	२२२.६५	३६७.१२
तरतूद	४.६४	४.४०
स्थगित कर्ज दायित्व (निव्वळ)	३१.०५	२.३३
अन्य बिगर - प्रचलित दायित्व	६६८.८६	८०५.२७
	३१८१.३४	**३२६१.४१**
एकूण समन्याय आणि दायित्व	**२९६७८.८८**	**२९११५.३१**

रोख प्रवाहांचा एकत्रिकृत अहवाल

रु. लाखात

तपशील	अर्धवर्ष अखेर ३०-०९-२०२० (अलेखापरीक्षित)	अर्धवर्ष अखेर ३०-०९-२०१९ (अलेखापरीक्षित)
ए. प्रचालन कार्यामधून रोख प्रवाह		
करपूर्व नफा	२६१.०७	९८.३६
समायोजन		
घसारा आणि परिशोधन खर्च	२०९.३२	१९९.८०
कमजोर आणि गैर-परिवर्तनीय रोखे	५.००	०.००
एफव्हीटीपीएल येथे मापित गुंतवणुकीच्या विक्रीवरील निव्वळ प्राप्ती	-२२१.०३	-१४९.८७
एफव्हीटीपीएल येथे मापित गुंतवणुकीच्या विक्रीवरील पुनर्मापनातून उद्भवलेला निव्वळ प्राप्ती	-४५.३८	-५.०४
विदेश विनिमय तोटा (निव्वळ)	६.५८	३.०७
वित्तीय खर्च	१७९.०४	२६५.५५
व्याज उत्पन्न	-५५.५०	-७०.३५
खेळत्या भांडवलाच्या बदलापूर्वी कार्यरत नफा	३३९.१०	३४१.५२
खेळत्या भांडवलाच्या बदलासाठी समायोजन		
व्यवसायिक स्वीकृतीयोग्यमधील घट / (वाढ)	-६६.१९	१३८.१७
गुंतवणूकदारांमधील घट / (वाढ)	२७१.३३	-१५७.६४
कर्जामधील घट	२.४२	६९.९८
वित्तीय मत्तेमधील घट	०.००	०.२७
अन्य मालमत्तांमधील घट	११०.५८	१३५.१६
तरतुदीमधील वाढ	९.९९	६.३६
वित्तीय दायित्वांमधील घट	-१४४.४७	-२०३.२९
अन्य दायित्वांमधील घट	-१३७.४०	-५०५.१७
देण्यांमधील वाढ	१७७.२६	११९.५४
रोख निर्मिती /प्रचालन कार्यक्रमामधून (मध्ये वापरलेली)	**५६२.६२**	**-५५.१०**
प्राप्ती कराचा भरणा (परताव्याच्या निव्वळ)	२.४९	-२०.११
रोख निर्मिती /प्रचालन कार्य मध्ये(मध्ये वापरलेली) (ए)	**५६५.११**	**-७६.०१**
बी. गुंतवणूक कार्यक्रमामधून रोख प्रवाह		
गुंतवणुकांची खरेदी	-१४०२.९२	-४९४.६०
गुंतवणुकांची विक्री	२३२७.६८	११११.६२
मालमत्ता, प्लान्ट आणि उपकरणांची खरेदी	-१९.२४	-०९१
अन्य अमूर्त मालमत्तांची खरेदी	-१३७६.१८	-३४४.१८
सीडब्ल्यूआयपीमध्ये वाढ	०.००	-२.०५
मालमत्ता, प्लान्ट व उपकरण आणि अमुर्त मालमत्तांच्या विक्रीमधून प्राप्ती	५३.४६	-६१.४०
अन्य बँक शिलकीमध्ये घट	४५.८५	०.००
प्राप्त व्याज	५५.५०	७०.३५
परिणत नियत ठेवीं (निव्वळ)	-२६७.९१	२३.९०
रोख निर्मिती /प्रचालन कार्य मध्ये(मध्ये वापरलेली) (बी)	**-५८३.७६**	**३१०.७३**
सी. वित्तपुरवठा कार्यक्रमामधून रोख प्रवाह :		
प्राप्ती / (परतफेड) दीर्घ - मुदत कर्जांची	५८९.००	२७०.७१
भाडेपट्टा दायित्वाची परतफेड (निव्वळ)	-१५०.१८	-६३.७२
अदा केलेला लाभांश (त्यावरील कर समाविष्ट)	०.००	-३५५.९७
अदा केलेले व्याज	-१४०.६८	-२६५.५५
निव्वळ रोख निर्मिती /(मध्ये वापरलेली) वित्तीय कार्यक्रम (सी)	**२९८.१४**	**-४१४.५३**
निव्वळ वाढ /(घट) रोख आणि रोख समांतर (ए + बी + सी)	**२७९.४९**	**-१७९.८१**
वर्ष प्रारंभी रोख आणि रोख समांतर	१७६९.१५	१०७३.७५
रोख आणि रोखवरील चलन अनुवादाचा प्रभाव	-१०५.३५	८७.०८
सदर कालावधी अखेर रोख आणि रोख समांतर	**१९४३.२९**	**९८१.०२**

टीप :

१. हे एकत्रीकृत अ-लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष कंपनी (भारतीय लेखांकन मानक) अधिनियम, २०१६ द्वारे सुधारित कंपनी (भारतीय लेखांकन मानक) अधिनियम, २०१५ सहवाचित कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') च्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचीत भारतीय लेखांकन मानकानुसार तयार करण्यात आले आहेत. सदर निष्कर्षांचे लेखापरीक्षक समितीद्वारे पुनर्विलोकन करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या ११ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेमध्ये संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे.
२. कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकाने ३० सप्टेंबर, २०२० समाप्त तिमाही आणि अर्ध वर्षाच्या निष्कर्षांचे पुनर्विलोकन केले आहे. फेरबदल न केलेले निष्कर्ष वितरीत करण्यात आले आहेत आणि उपरोक्त निष्कर्षांसह स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आले आहेत.
३. कंपनी कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत विनिर्देशित अनुसार कंपनी (भारतीय लेखांकर मानक) अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचीत अनुसार इंड एएस १०८ च्या आवश्यकतेनुसार, कंपनी इंटरनेट आधारित उत्पादन पोचवणी आणि सेवेच्या एकल व्यवसाय विभागामध्ये कार्यरत असल्यामुळे प्रकटनाची आवश्यकता नाही.
४. समुहाने, हे अंतरिम संक्षिप्त वित्तीय निष्कर्ष तयार करताना, वित्तीय आणि बिगर - वित्तीय मालमत्तांची वहनक्षम रक्कम समाविष्ट करून, कोविड-१९ संक्रमणामुळे होणाऱ्या परिणामांची शक्यता विचारात घेतली आहे. सदर साथीच्या साथरोगामुळे जागतिक आर्थिक स्थितीमधील भविष्यातील संभाव्य अनिश्चितता संबंधित गृहितक विकसित करताना, सदर मालमत्तांची वहनक्षम रक्कम योग्य वेळेत पुनर्प्राप्त करण्याच्या उद्देशाने, सदर अंतरिम संक्षिप्त वित्तीय निष्कर्षांच्या मंजुरीच्या तारखेला, क्रेडिट रिपोर्टस् आणि संबंधित माहिती आणि आर्थिक अंदाज आणि विशेषज्ञासह इंटरनेट आणि बाह्य स्त्रोतांचा उपयोग केला आहे.
५. नोकरी दरम्यान कर्मचाऱ्याचा लाभ आणि नोकरी पश्चात लाभ संबंधित सामाजिक सुरक्षा, २०२० (''संहिता'') संहितेला सप्टेंबर, २०२० मध्ये राष्ट्रपतींची संमती प्राप्त झाली. सदर संहिता गॅझेट ऑफ इंडियामध्ये प्रसिध्द झाली आहे. तथापी, सदर सहिंता प्रभावी होण्याची तारीख अधिसूचीत करण्यात आलेली नाही. सदर संहिता प्रभावी होईल तेव्हा समूहाद्वारे परिणामांचे मूल्यांकन करण्यात येईल.
६. कंपनीचे ३० सप्टेंबर, २०२० अखेरचे तिमाही आणि अर्ध वर्षाचे एकत्रिकृत वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या संकेतस्थळ www.itlindia.com वर उपलब्ध आहेत.

इन्ट्रासॉफ्ट टेक्नॉलॉजिस लिमिटेडकरिता
हस्ता/-
अरविंद कजारीया
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००१०६९०१

स्थळ : कोलकाता
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०२०

३० सप्टेंबर, २०२० रोजी संपणाऱ्या तिमाहीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा